॥ श्री ॥
आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे
www.veerbhuminews.com

*** सुविचार ***
जीवनाचा अर्थ विचारायचा असेल
तर तो आकाशाला आणि
समुद्राला विचारा.

आता राहा प्रत्येक क्षणाला अपडेट
'वीरभूमी'च्या बातम्या आपल्या बोटावर
आपल्या मोबाईलमध्ये प्ले स्टोअरमध्ये जावून veerbhumi ॲप डाऊनलोड करा. आणि तेथे वाचा एक महिण्याचे वीरभूमी पेपर व ताज्या बातम्या एका क्लिकवर तेही अगदी मोफत.
आता आपल्यासाठीच veerbhumi ॲप
आता बातमीबरोबरच बरेच काही
मोबाईलमधील Google Play वर जा आणि सर्च करा veerbhumi

■ अहिल्यानगर ■ रविवार, दि. ४ मे २०२५ ■ वर्ष ६ वे ■ अंक २३ वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 9420802145

## SPOT NEWS

### करुणा मुंडेंच्या अर्जामुळे मुंडेंची आमदारकी धोक्यात

● **मुंबई** – वांद्रेनंतर माझगाव कोर्टानेही माजी मंत्री धनंजय मुंडेंना दणका दिल्यानंतर त्यांच्या पत्नी करुणा मुंडे यांनी आता पुन्हा एकदा मोठे पाऊल उचलले आहे. त्या आता मंत्रिपदाचा राजीनामा दिलेल्या धनंजय मुंडेंच्या आमदारकी रद्द होण्यासाठी मैदानात उतरल्या आहेत. त्यांनी करुणा शर्मा–मुंडे यांनी धनंजय मुंडेंची आमदारकी रद्द करण्यासाठी न्यायालयात याचिका दाखल केली आहे. काही दिवसांपूर्वीच करुणा शर्मा–मुंडे यांनी ज्या दिवशी धनंजय मुंडेंची आमदारकी घालवेन, त्या दिवशी माझा मोठा विजय असे म्हटले होते. त्याचवेळी त्यांनी पुढच्या सहा महिन्यात धनंजय मुंडेंचीही आमदारकी जाणार हे नक्की असल्याचा दावा करत मोठी खळबळ उडवून दिली होती. करुणा मुंडे यांनी आता न्यायालयात याचिका दाखल केली आहे. ही याचिका त्यांनी वकील चंद्रकांत ठोंबरे यांच्यामार्फत दाखल केली आहे. धनंजय मुंडे यांच्या गुंडाकडून मिळणाऱ्या धमक्याबाबत तसेच या प्रकरणाचा निकाल लागत नाही, तोपर्यंत साखर कारखाने किंवा इतर प्रॉपर्टी कुणी खरेदी करू नये यासाठी करुणा शर्मा–मुंडे यांनी ही याचिका न्यायालयात दाखल केल्याचीही माहिती आहे.

### शिवसेनेचा फैसला ७ मे रोजी होणार?

● **मुंबई** – शिवसेनेतील फुटीनंतर निवडणूक आयोगाने शिवसेना आणि धनुष्यबाण हे एकनाथ शिंदे यांना दिले होते. या निर्णयाच्या विरोधात उद्धव ठाकरे हे सुप्रीम कोर्टात गेले होते. या प्रकरणी फेब्रुवारी २०२३ मध्ये त्यांनी याचिका दाखल केली होती. आता या प्रकरणी कोर्टात बुधवारी (७ मे) सुनावणी होणार आहे. त्यामुळे शिवसेना पक्ष आणि धनुष्यबाण चिन्ह कोणाचे यावर फैसला होणार आहे. शिवसेनेत पडलेल्या फुटीनंतर एकनाथ शिंदे भाजपच्या पाठिंब्याने मुख्यमंत्री झाले. त्यावेळी एकनाथ शिंदे आणि उद्धव ठाकरे यांना निवडणूक आयोगाने वेगवेगळे चिन्ह दिले होते. मात्र, पुढे निर्णय देताना निवडणूक आयोगाने शिवसेना मूळ पक्ष आणि धनुष्यबाण चिन्ह एकनाथ शिंदेंना देण्याचा निर्णय घेतला होता. तत्कालीन विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी देखील शिंदेंच्या बाजूने फैसला दिला होता. त्यांच्या निर्णयामुळे एकनाथ शिंदेंसोबत असलेले आमदार अपात्र ठरले नव्हते. तसेच विधिमंडळातील शिवसेना पक्ष एकनाथ शिंदेंकडे राहिला होता. त्यानंतर झालेल्या विधानसभा निवडणुकीत महायुती पुन्हा सत्तेत आली. शिंदेंचे उमेदवार धनुष्यबाण चिन्हावर लढले होते.

## भारतीय लष्कराचे ब्रम्हास्त्र, सुपरसॉनिक ब्रम्होस

### सीमेवर तणाव, भारतीय हद्दीतूनच शत्रूला उद्ध्वस्त करण्याची क्षमता

● **नवी दिल्ली । वीरभूमी–**
पहलगाम हल्ल्यानंतर देशात तणावाचे वातावरण आहे. त्यातच दुसरीकडे पाकिस्तानचा कांगावा आणि कुरापतीही वाढल्या आहेत. यादरम्यान भारतासाठी एक महत्वाची बातमी समोर आली आहे. भारताच्या हवाई शक्तीला लवकरच एक घातक धार मिळणार आहे. भारतीय हवाई दल आणि नौदल त्यांच्या राफेल लढाऊ विमानांमध्ये ब्रम्होस–एनजी (नेक्स्ट जनरेशन) सुपरसॉनिक क्रूझ क्षेपणास्त्र तैनात करण्याची तयारी करत आहेत. २९० किलोमीटरचा पल्ला आणि ४१७० किमी/तास वेगाने उड्डाण करणारे हे क्षेपणास्त्र शत्रूवर अचूक आणि विनाशकारी प्रहार करण्यास सक्षम असणार आहे.

डिसॉल्ट एव्हिएशनने राफेलमध्ये भारताच्या स्वदेशी शस्त्र प्रणालींचे एकत्रीकरण करण्यास मान्यता दिली, ज्यामुळे 'मेक इन इंडिया'मोहिमेलाही नवीन बळ मिळेल आणि भारताचे रणनैतिक स्वातंत्र्य आणखी मजबूत होईल. यामुळे पाकिस्तानचे टेन्शन वाढले आहे. कारण पाकिस्तानला आधीच भारताच्या राफेल ताफ्याची चिंता होती. आता जेव्हा



या अत्याधुनिक लढाऊ विमानांमध्ये ब्रम्होस–एनजीसारख्या घातक क्षेपणास्त्रे बसवली जातील, तेव्हा त्याचा त्यांच्या दहशतवादाला पाठिंबा देणाऱ्या धोरणावर मोठा परिणाम होईल. आता भारतीय हवाई क्षेत्रात घुसखोरी करण्याच्या शत्रूच्या प्रयत्नांना दिले जाणारे प्रत्युत्तर अधिक जलद, अधिक अचूक आणि प्राणघातक असेल, असे सांगण्यात आले.

राफेल हे पाकिस्तानच्या जेएफ–१७ सारख्या विमानांपेक्षा अनेक पटीने अधिक सक्षम आहे आणि ब्रम्होस–एनजीच्या समावेशानंतर ते एक धोरणात्मक स्ट्राइक प्लॅटफॉर्म बनेल. विशेष म्हणजे सीमा ओलांडल्याशिवाय हे क्षेपणास्त्र पाकिस्तानमधील कोणत्याही लष्करी तळाला, कमांड सेंटरला किंवा दहशतवादी लाँचपॅडला क्षणार्धात लक्ष्य करू शकते. हे क्षेपणास्त्र हवेतून सोडले जाणारे, जमिनीवरून आणि जहाजावरून मारा करणारे आवृत्त्यांमध्ये उपलब्ध असेल. याचा अर्थ जमीन, पाणी आणि आकाश या प्रत्येक आघाडीवर समान प्राणघातक शक्ती असणार आहे.

या क्षेपणास्त्राची पहिली चाचणी २०२६ मध्ये होणार आहे आणि ते उत्तर प्रदेशातील लखनौ येथे बांधल्या जाणाऱ्या ब्रम्होस उत्पादन केंद्रात तयार केले जाणार आहे. हे केंद्र क्षेपणास्त्र उत्पादनात भारताच्या स्वावलंबी होण्याच्या दिशेने एक मोठे पाऊल ठरणार आहे. ब्रम्होस–एनजी ही ब्रम्होस सुपरसॉनिक क्रूझ क्षेपणास्त्राची हलकी आणि प्रगत आवृत्ती आहे, जी आधुनिक लढाऊ विमाने आणि मोबाइल प्लॅटफॉर्मवरून प्रक्षेपित करण्यासाठी विकसित केली जात आहे.

ब्रम्होस–एनजीचा वेग मॅक ३.५ (सुमारे ४१७० किमी/तास) आहे, ज्यामुळे तो शत्रूच्या रडार आणि संरक्षण प्रणालींना चुकवून अचूकतेने हल्ला करू शकतो. याची रेंज २९० किलोमीटर आहे, म्हणजेच हे मिसाईल सीमा ओलांडल्याशिवाय सीमेपलीकडे असलेल्या शत्रूंच्या महत्त्वाच्या तळांना नष्ट करू शकते.

## महाराष्ट्रातील महापालिका निवडणुकांचे बिगुल वाजणार?

● **मुंबई । वीरभूमी–**
मुंबई महापालिकेने निवडणुकीची तयारी सुरू केली आहे. ६ मे रोजी सर्वोच्च न्यायालयाच्या सुनावणी दिवशीच निवडणुकांच्या तयारीसाठी अधिकाऱ्यांना रुजू होण्याचे आदेश दिल्याची माहिती सुत्रांनी दिली आहे. सरकारी कार्यालयातील कर्मचाऱ्यांना केंद्रस्तरीय अधिकारी पदावर रुजू होण्याचेही आदेश दिले आहेत. अन्यथा कारवाई होऊ शकते असे सांगण्यात आले आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका रखडल्याने राज्यातील मुंबई, पुणे, पिंपरी चिंचवडसह तब्बल २३ महापालिकांवर प्रशासकीय राजवट आहे. सर्वच राजकीय पक्षांना स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे वेध लागले आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आणि त्यामध्ये ओबीसी आरक्षण हे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. सर्वोच्च न्यायालयासमोर हे प्रकरण



प्रलंबित असल्यामुळे राज्यात अनेक ठिकाणी चार–चार वर्षांपासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका झालेल्या नाही. देशात लोकसभेपाठोपाठ राज्यात विधानसभा निवडणूक झाली. त्यानंतर राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका कधी होतील, यावर सर्वत्र चर्चा सुरू आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ओबीसी आरक्षणाचा मुद्दा रखडल्याने राज्य सरकारने सर्वोच्च न्यायालयात याचिका केली होती. या याचिकेच्या माध्यमातून निवडणुका घेण्यासंदर्भात विनंती न्यायालयाकडे करण्यात आली. तर ओबीसी आरक्षण असो किंवा नसो मात्र निवडणुका व्हाव्यात, अशी याचिकाकर्त्यांनी मागणी आहे.

## राष्ट्रवादीच्या कार्यक्रमाला ठाकरे, पवारांसह चव्हाणांचा नकार, तर शिंदेंची दांडी

● **अकोले । वीरभूमी–**
राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने आयोजित 'गौरवशाली महाराष्ट्र महोत्सव २०२५' या कार्यक्रमाचा तिसरा दिवस जल्लोषपूर्ण वातावरणात संपन्न झाला. मात्र शरद पवार यांच्यासह उद्धव ठाकरे, पृथ्वीराज चव्हाण यांनी या कार्यक्रमाला यायला नकार दिला, तर महायुतीचा घटक असूनही एकनाथ शिंदे यांनी दांडी मारली. त्यामुळे एकनाथ शिंदे यांच्या अनुपस्थितीवर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी जाहीर कार्यक्रमात नाराजी व्यक्त केली.

दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने आयोजित 'गौरवशाली महाराष्ट्र महोत्सव २०२५' या कार्यक्रमाचा तिसरा दिवस जल्लोषपूर्ण वातावरणात संपन्न झाला. यावेळी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण, माजी मुख्यमंत्री नारायण राणे, छगन भुजबळ, प्रफुल्ल पटेल, सुनील तटकरे यांसह अन्य मान्यवर उपस्थित होते. मात्र शरद पवार यांच्यासह उद्धव ठाकरे, पृथ्वीराज चव्हाण यांनी कार्यक्रमाला यायला नकार दिला, तर महायुतीचा घटक असूनही एकनाथ शिंदे यांनी दांडी मारली. त्यामुळे एकनाथ शिंदे यांच्या अनुपस्थितीवर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी जाहीर कार्यक्रमात नाराजी व्यक्त केली.

गौरवशाली महाराष्ट्र महोत्सवाच्या निमित्ताने राष्ट्रवादी पक्षाने राज्यातल्या सर्वच माजी मुख्यमंत्र्यांचा सत्कार करण्याचे ठरवले होते. त्यात महायुतीत असलेले माजी मुख्यमंत्री सहभागी झाले, पण महाविकास आघाडीत असलेल्या माजी मुख्यमंत्र्यांनी मात्र या कार्यक्रमाकडे पाठ फिरवणे पसंत केले.

माजी मुख्यमंत्र्यांच्या सत्कारासाठी शरद पवार, उद्धव ठाकरे, पृथ्वीराज चव्हाण या महाविकास आघाडीच्या नेत्यांसह भाजपावासी झालेल्या नारायण राणे, अशोक चव्हाण यांना निमंत्रण देण्याचे प्रयोजन अजित पवार यांच्या राष्ट्रवादीने केले होते. पण महाविकास आघाडीच्या नेत्यांनी याकडे पाठ फिरवली. महत्त्वाचे म्हणजे शरद पवारांना या कार्यक्रमाचे निमंत्रण देण्यात आले होते, पण त्यांनी ते निमंत्रण स्वीकारण्यास नकार दिल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. दरम्यान, या कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, नारायण राणे, अशोक चव्हाण यांचा सन्मान करण्यात आला.

अजित पवार यांच्या महायुतीतील सहभागानंतर एकनाथ शिंदे यांच्या नाराजीची चर्चा होती. अशातच एकनाथ शिंदे यांनी आज राष्ट्रवादीच्या कार्यक्रमाला येणे टाळले. त्यांच्याऐवजी शिंदे गटाचे प्रतिनिधी म्हणून प्रताप सरनाईक या कार्यक्रमात सहभागी झाले. त्यामुळे आज एकनाथ शिंदे यांच्या गैरहजेरीने चर्चांना आणखी बळ मिळाले.

## शिर्डीचे साईबाबा समाधी मंदिर बॉम्बने उडवून देण्याची ई-मेलवरुन धमकी

● **नगर । वीरभूमी–**
पहलगाम अतिरेकी हल्ल्यामुळे अवघ्या देशात संतापाची लाट उसळली असताना आता शिर्डीचे साईसमाधी मंदिर बॉम्बने उडवून देण्याची धमकी देण्यात आली आहे. यासंबंधीचा एक ईमेल साई संस्थानला मिळाला आहे. या ईमेलमुळे पोलिस प्रशासन अलर्ट मोडवर आले आहे.

गत २२ एप्रिल रोजी जम्मू काश्मीरच्या पहलगाम येथे अतिरेकी हल्ला झाला होता. त्यात महाराष्ट्राच्या ६ जणांसह २६ पर्यटकांचा बळी गेला होता. या घटनेमुळे संपूर्ण देशात रोष पसरला आहे. विशेषत: या प्रकरणी पाकिस्तानला धडा शिकवण्याची मागणी केली जात आहे. यासंबंधी केंद्र सरकारवर कमालीचा दबाव असताना आता शिर्डी स्थित साईसमाधी मंदिराला बॉम्बने उडवण्याची धमकी दिली आहे.

यासंबंधीच्या माहितीनुसार, साई



संस्थानला धमकीचा एक ईमेल मिळाला आहे. त्यात साईसमाधी मंदिर पाइपबॉम्बने उडवण्याचा इशारा देण्यात आला आहे. या मेलमध्ये आणखी काय आहे? हे स्पष्ट झाले नाही. पोलिसांनी यावर भाष्य करणे टाळले आहे. पण यामुळे सुरक्षा यंत्रणांत एकच खळबळ माजली आहे. या धमकीनंतर पोलिसांनी मंदिर परिसराची तपासणी करून तेथील सुरक्षा व्यवस्था चोख केली आहे. हा खरेच धमकीचा ईमेल आहे की, कुणी खोडसाळपणा केला आहे, याचा तपास पोलिस घेत आहेत.

उल्लेखनीय बाब म्हणजे केंद्रीय मंत्री सी आर पाटील यांनी शुक्रवारीच साईसमाधीचे दर्शन घेतले होते. त्यावळी त्यांनी पहलगाम हल्ल्याप्रकरणी पाकला कसे प्रत्युत्तर दिले जाईल हे तुम्ही तुम्ही पहाच असे सूचक विधान त्यांनी केले होते. त्यानंतर काही तासांतच साई संस्थानला धमकीचा ईमेल प्राप्त झाल्यामुळे चिंता व्यक्त केली जात आहे. सी आर पाटील यांच्या उपस्थितीत काल राहता येथील गोदावरी कालव्याच्या नुतनीकरणाच्या कामाला सुरुवात झाली. या कार्यक्रमात त्यांनी पहलगाम हल्ल्याचा दाखला देत सत्कारही नाकारला होता. पहलगाम हल्ल्याचा बदला घेतला जाणार नाही तोपर्यंत आपण सत्कार स्वीकारणार नाही असे ते म्हणाले होते.

## राजूर येथील काविळच्या साथीने दोघांचा मृत्यू; माजी आ. वैभव पिचड आक्रमक

● **अकोले । वीरभूमी –**
अकोले तालुक्यातील राजुर ग्रामपंचायत हद्दीत कावीळने घेतलेले उग्र रूप अद्यापही आटोक्यात आलेले नाही. या साथीमुळे आज दुसऱ्या १३ वर्षाच्या मुलीचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली असून, एकूण रुग्णसंख्या ३५० च्यावर गेली आहे. या पार्श्वभूमीवर गावात चिंतेचे व भीतीचे वातावरण पसरले आहे.

माजी आमदार वैभवराव पिचड यांनी तातडीने गावास भेट देत परिस्थितीचा आढावा घेतला. त्यांनी आरोग्य अधिकारी व गटविकास अधिकारी यांना गावातल्या आरोग्य व्यवस्थेतील हलगर्जीपणाबाबत जाब विचारला. प्रशासनाचे अपयश आणि वेळेवर उपाययोजना न केल्यामुळेच ही परिस्थिती ओढवली असल्याचे त्यांनी ठासून सांगितले.

पिचड यांनी मृत्यू पावलेल्या मुलीच्या घरी जाऊन कुटुंबीयांचे सांत्वन केले. त्यानंतर त्यांनी ग्रामस्थांसमवेत राजुर ग्रामपंचायत कार्यालयात बैठक घेतली. यावेळी ग्रामस्थांनी ग्रामपंचायतीच्या कारभारावर तीव्र नाराजी व्यक्त केली. गावात गेल्या काही महिन्यांपासून स्वच्छता मोहीम योग्य पद्धतीने राबवली जात नसल्याचे, पाणीपुरवठ्याचे स्रोत दूषित झाल्याचे, तसेच सांडपाणी व्यवस्थापनात घोळ असल्याचे ग्रामस्थांनी स्पष्टपणे सांगितले.

या बैठकीत ग्रामपंचायतीच्या निधीच्या वापराविषयी, काविळीच्या साथीबाबत केलेल्या उपाययोजनांविषयी व आरोग्य विभागाशी असलेल्या समन्वयावर अनेक गंभीर प्रश्न उपस्थित करण्यात आले. ग्रामस्थांचा रोष पाहता उपसरपंच संतोष बनसोडे यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारत आपल्या पदाचा राजीनामा जाहीर केला.

गावातील परिस्थितीचा गांभीर्य लक्षात घेता, तातडीने आरोग्य पथके, वैद्यकीय शिबिरे, पाणी साठ्यांची तपासणी व निर्जंतुकीकरण मोहीम राबवावी, अशी मागणी माजी आमदार पिचड व ग्रामस्थांनी प्रशासनाकडे केली आहे.

या घटनेनंतर प्रशासनाने हालचाली सुरू केल्या असल्या तरी अजूनही उपाययोजनांमध्ये गती नसल्याने गावकऱ्यांमध्ये अस्वस्थता आहे. राजुरसारख्या मोठ्या गावात काविळीसारखी साथ एकामागून एक



बळी घेत असेल, तर ही फक्त वैद्यकीय नव्हे तर नियोजनातील चूक असल्याचे स्पष्ट होत आहे. या पार्श्वभूमीवर राजुर ग्रामपंचायत आणि आरोग्य यंत्रणा यांच्यावर आता अधिक जबाबदारी येऊन ठेपली आहे.

# SPOT NEWS

## मालमत्ता करामधील सर्वसाधारण करामध्ये मे अखेरीपर्यंत १० टक्के सवलत

**● नगर । वीरभूमी-**

नवीन आर्थिक वर्षात पाणीपट्टीच्या नवीन दरासह बिले वाटप सुरू करण्यात आले आहे. महानगरपालिका अधिनियमानुसार एप्रिल महिन्यात सर्वसाधारण करावर १० टक्के सवलत दिली जाते. यंदा नवीन दरामुळे बिले वाटप उशिराने सुरू झाले आहे. त्यामुळे सर्वसाधारण करावरील सवलतीचा लाभ सर्वांना मिळावा, यासाठी सवलतीची मुदत वाढवण्यात आली असून, १ मे ३१ मे या कालावधीत सर्वसाधारण करावरील १० टक्के सवलत कायम ठेवण्यात आली आहे. नागरिकांनी याचा लाभ घेऊन वेळेत कराचा भरणा करावा व दंड टाळावा, असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी केले आहे. महानगरपालिकेच्या मालमत्ता कर व पाणीपट्टीच्या वसुलीला मागील आर्थिक वर्षात नगरकरांनी चांगला प्रतिसाद दिला. त्यामुळे विक्रमी वसुली झाली. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १४० अ नुसार करात एप्रिलमध्ये १०%, मे व जूनमध्ये ८% अशी सर्वसाधारण करात सूट दिली जाते. या वर्षात पाणीपट्टीच्या नवीन दरानुसार बिले वाटप करण्यासाठी काही प्रमाणात विलंब झाला आहे. त्यामुळे एप्रिल महिन्यात दिली जाणारी १०% सवलत अनेकांना मिळू शकली नाही. नवीन दरानुसार बिलांचे वाटप महानगरपालिकेकडून सुरू करण्यात आले आहे. नागरिकांना सवलतीचा लाभ मिळावा, यासाठी मे महिन्यातही १० टक्के सवलत सर्वसाधारण करावर दिली जाणार आहे. तसा निर्णय महानगरपालिका प्रशासनाने घेतला आहे. नागरिकांनी मे अखेरपर्यंत मालमत्ता कर व पाणीपट्टी भरून सर्वसाधारण करावरील १० टक्के सवलतीचा लाभ घ्यावा. मागील वर्षात अनेकांनी वेळेत कर न भरल्याने त्यांना दंड भरावा लागला. त्यामुळे या आर्थिक वर्षात सवलतीचा लाभ घेऊन वेळेत मालमत्ता कर व पाणीपट्टी भरावी, असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी केले आहे. दरम्यान, काही अडचणींमुळे बिले न मिळाल्यास, नागरिकांनी त्यांच्या प्रभाग समिती कार्यालयात जाऊन बिल काढून घ्यावे व सवलतीचा लाभ घेऊन तत्काळ कराचा भरणा करावा, असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी केले आहे.

## श्री समर्थ प्रशालेत महाराष्ट्र दिन व कामगार दिन उत्साहात साजरा

**● नगर । वीरभूमी-**

सावेडीतील श्री समर्थ विद्या मंदिर प्रशाला प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विभाग येथे एक मे महाराष्ट्र व कामगार दिन श्री समर्थ विद्या प्रसारक मंडळाचे सचिव तथा प्राथमिक विभागाचे शालेय समिती चेअरमन सुरेश क्षीरसागर यांच्या हस्ते ध्वजारोहणाने झाला. प्रशालेच्या मुख्याध्यापिका तथा प्राचार्या संगीता जोशी, प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापिका सौ. धनश्री गुंफेकर, पर्यवेक्षक सुनील कानडे,क्रिडाशिक्षक पोपट लोंढे आदी मान्यवर उपस्थित होते. सुरेश क्षीरसागर म्हणाले, आपल्या महाराष्ट्राची ऐतिहासिक परंपरा उज्वल आहे अनेक संत महात्म्यांच्या उपदेशाने ही भूमी पवित्र झाली आहे प्रत्येकाने सुदृढ नागरिक होऊन या महाराष्ट्राची प्रगती करावी. कार्यक्रमाची सुरुवात श्री समर्थ प्रतिमा पूजनाने झाली.

# ठाणे कारागृहाला 'क्रांतीकारक राघोजी भांगरे' यांचे नाव देणार

### आदिवासी विकास मंत्री अशोक उइके यांचे आश्वासन । राघोजी भांगरे यांच्या १७७ व्या स्मृती दिनानिमित्त ठाणे मध्यवर्ती कारागृह येथे अभिवादन

**● अकोले । वीरभूमी-**

समाजाच्या मागणीनुसार आद्य क्रांतिकारक राघोजी भांगरे यांची स्मृती व त्यांचे क्रांतिकारी काम व इंग्रजाबरोबर सावकार शाही विरोधी दिलेला लढा व समाजाला दिलेले संरक्षण हे काम पाहता आद्य क्रांतीवीर राघोजी भांगरे मध्यवर्ती कारागृह ठाणे असे नामकरण करण्याचे महाराष्ट्र सरकारकडे मागणी करण्याचे आश्वासन आदिवासी मंत्री ना. अशोकराव उईके यांनी दिले.



दि. २ मे २०२५ रोजी क्रांतीवीर राघोजी भांगरे यांना अभिवादन करण्यासाठी महाराष्ट्र राज्याचे आदिवासी विकास मंत्री मा. नाम. अशोक उइके, पालघरचे खासदार हेमंत सावरा, ठाण्याचे आ. संजय केळकर, माजी आमदार वैभवराव पिचड, कोकण विभागाचे आ. निरंजन डावखरे, ठाणे सेंट्रल जेल अधिक्षीका भोसले मॅडम, सामाजिक कार्यकर्ते श्री किरकिरे, दत्तात्रय भूयाळ, अखिल भारतीय आदिवासी विकास परिषदेचे युवा अध्यक्ष लकीभाऊ जाधव पुणे जिल्हा अध्यक्ष गोविंद साबळे, डॉ. सुपे, डॉ. वी. वी. पोपेरे, श्रमिक संघटना ठाणेचे हंसराज खेवरा, दिलीप पटेकर, निसरट सर, दिगंबर नवाळे, पी. सी. झांबाडे (लेखक), डॉ. पराड, अशोक इरनक (सामाजिक कार्यकर्ते), संजय भांगरे (माजी सरपंच), राजेंद्र भांगरे, चेतन मेमाने (मुंबई युवा अध्यक्ष), साठे सर, भांगरेताई, हिले ताई, सगबोर ताई, साबळे ताई, झांबाडे ताई, सदर मान्यवर समाज बांधव विविध संघटनांचे पदाधिकारी ठाणे, पुणे, नगर, नाशिक, पालघर आणि रायगड या जिल्ह्यातून आलेले समाज बांधव यांनी आद्य क्रांतीवीर राघोजी भांगरे यांना अभिवादन केले.

तसेच हेमंत सावरा आपल्या भाषणात म्हणाले की, आद्य क्रांतिकारक राघोजी भांगरे यांच्या नावाचा धडा शालेय अभ्यास क्रमात यावा अशी विनंती प्रशासनाला केली.

आमदार संजय केळकर यांनी व निरंजन डावखरे यांनी ठाणे कलेक्टर चौक येथे आद्य क्रांतिकारक राघोजी भांगरे यांचा पुतळा उभारण्याचे आश्वासन आदिवासी समाज बांधवांना दिले.

यावेळी अनेक मान्यवरांनी हा आदर्श घेऊन नव्या पिढीने काम करावे, असे मनोगत व्यक्त केले व आद्य क्रांतिकारक राघोजी भांगरे यांना अभिवादन केले. सदर कार्यक्रमाचे सूत्र संचलन लकीभाऊ जाधव यांनी केले. आभार रामनाथ भोजने यांनी मानले.

### स्व. मधुकर पिचड यांच्या कार्याला दिला उजाळा

माजी आदिवासी विकास मंत्री स्व.मधुकरराव पिचड यांनी आद्य क्रांतिकारक राघोजी भांगरे यांचे ठाणे कारागृहात स्मारक उभारले, ठाणे चौकाला आद्य क्रांतिकारक राघोजी भांगरे यांचे नाव दिले. राघोजी भांगरे यांचा क्रांतिकारी चळवळीचा व त्यांच्या जीवनाचा इतिहास स्व. डॉ. गोविंद गारे यांच्या कडून लिहून घेतला. त्यामुळे आद्य क्रांतिकारक राघोजी भांगरे यांचे कार्य समाजापुढे आलेले आहे. यावेळी स्व. मधुकरराव पिचड यांच्या या कार्याला उजाळा देण्यात आला.

## शिष्यवृत्ती परीक्षेत भारदे विद्यालयाचे उज्ज्वल यश



**● शेवगाव । वीरभूमी-**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद आयोजित इयत्ता पाचवी व आठवी शिष्यवृत्ती परीक्षेत पद्मभूषण बाळासाहेब भारदे विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी उज्ज्वल यशाची परंपरा कायम राखली आहे.

इयत्ता पाचवी शिष्यवृत्ती परीक्षेत शेख हयात २१४, शिंगवी समता १९४, कातकडे दिपक १९२, देशपांडे भार्गव १८६, खांबट ध्रुवबाळ १८६, तर इयत्ता आठवी शिष्यवृत्ती परीक्षेत प्रजापती कृष्णा २५४, देशपांडे सुमित २२८, जोशी अर्णव २०६, कदम ज्ञानेश २०२, बंब मीत १९८ व जाधव पवन १९६ आदींनी यश संपादन केले आहे.

पाचवी शिष्यवृत्ती परीक्षार्थी विद्यार्थ्यांना निलेश मोरे, बाळासाहेब घावटे, रवींद्र पवार यांनी तर आठवीच्या विद्यार्थ्यांना विशाल जहागीरदार, राहुल भोंगळे, मीनाक्षी कदम, सपना देशमुख यांनी मार्गदर्शन केले.

संस्थेचे अध्यक्ष रमेश भारदे, उपसचिव हरीश भारदे, प्राचार्य शिवदास सरोदे, उपप्राचार्य संजय कुलकर्णी, पर्यवेक्षक गोकुळ घनवट, उमेश घेवरीकर, कार्यालयीन अधिक्षक सदाशिव काटेकर यांचे हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला.

## आद्य क्रांतिकारक राघोजी भांगरे यांच्या १७७ व्या पुण्यतिथी निमित्ताने अभिवादन

**● अकोले । वीरभूमी-**

आद्य क्रांतिकारक राघोजी भांगरे यांच्या १७७ व्या पुण्यतिथी निमित्त अकोले येथील जनजाती कल्याण आश्रम येथे अभिवादन करण्यात आले.



आद्य क्रांतिकारक राघोजी भांगरे यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन केले. यावेळी नगराध्यक्ष बाळासाहेब वडजे, भाजपचे अकोले मंडल अध्यक्ष राहूल् देशमुख, रोटरी क्लब अकोले सेन्ट्रलचे अध्यक्ष प्राचार्य विद्याचंद्र सातपुते, पत्रकार अमोल वैद्य, माजी नगरसेवक सचिन शेटे, बजरंग दलाचे तालुकाध्यक्ष राहूल ढोक, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे बापू टेके, अनिकेत साळुंके, मॉडर्न हायस्कूलच्या सौ. संगिता कचरे, राजू भांगरे, बाबासाहेब नाईकवाडी, राहूल जगताप, पत्रकार प्रविण देठे, ऋषी जाधव, हर्षदीप डावरे, व्यवस्थापक व विद्यार्थी उपस्थित होते.

यावेळी प्राचार्य विद्याचंद्र सातपुते, राहुल देशमुख, बाळासाहेब वडजे, अमोल वैद्य आणि प्राचार्य संतोष कचरे यांनी आद्यक्रांतीकारक राघोजी भांगरे यांच्या क्रांतिकारी चळवळीला त्यांनी अन्यायाविरुद्ध दिलेल्या लढ्याला उजाळा दिला. व देशपातळीवर तालुक्याचे नावलौकिक वाढविला, अशा आद्य क्रांतिकारक राघोजी भांगरे यांची पुण्यतिथी तालुका पातळीवर मोठया प्रमाणावर साजरी करण्यात यावी असे मत व्यक्त केले. त्यास उपस्थित सर्वांनी दुजोरा दिला.

प्राचार्य संतोष कचरे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करुन आभार मानले.

# शेवगाव शहराच्या नवीन पाणीपुरवठा योजनचे काम प्रगतीपथावर

### मुख्याधिकारी विजया घाडगे यांची माहिती । निर्धारीत वेळेत योजना पूर्ण होण्यासाठी नागरीकांनी सहकार्य करण्याचे आवाहन

**● शेवगाव । वीरभूमी-**

शेवगाव शहरातील पाणी प्रश्नांसह नागरी समस्या सोडविण्याच्या मागणीसाठी सर्व पक्षीय कृती समितीच्यावतीने सोमवार दि. ५ मे रोजी क्रांती चौकात रास्तारोकोचा इशारा देण्यात आला आहे. या इशाऱ्यानंतर पालिकेच्या मुख्याधिकारी विजया घाडगे यांनी प्रसिद्धी पत्रक काढून शेवगाव शहर नवीन पाणीपुरवठा योजनेच्या सुरु असलेल्या कामांबाबत माहिती देत हे काम दर्जेदार व वेळेत पूर्ण होण्यासाठी शहरवासीयांनी सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. तसेच नागरीकांची काही अडचण असल्यास थेट नगरपालिका प्रशासन, मुख्याधिकारी यांच्याशी संवाद साधण्याचे आवाहन केले आहे.

मंगळवार दि. २९ एप्रिल रोजी शेवगाव शहरातील पाणी टंचाईसह इतर नागरी समस्या सोडविण्यासाठी सर्व पक्षीय कृती समितीच्यावतीने तहसीलदार प्रशांत सांगडे यांना निवेदन देत सोमवार दि. ५ मे रोजी रास्तारोको करण्याचा इशारा दिला आहे. या इशाऱ्यानंतर शेवगाव शहराच्या नवीन पाणीपुरवठा योजने विषयी मुख्याधिकारी विजया घाडगे यांनी प्रसिद्धी पत्रक काढून नवीन पाणीपुरवठा योजनेची सद्य परीस्थिती स्पष्ट केली आहे. यामध्ये म्हटले आहे की, नवीन पाणीपुरवठा योजनेचे काम निकषानुसार व वेगाने प्रगती पथावर आहे. सध्या जायकवाडी जलाशयात पाणी असल्याने अप्रोच चॅनेल, जॅकवेल, अप्रोच ब्रीज ही कामे करता येत नाहीत. धरणातील पाणी कमी होताच, जोडचर, जॅकवेल पंप हाऊस, पोहोच पुल ही कामे सुरु करण्यात येतील. सद्यस्थितीत शहर, उपनगरे येथील वितरण व्यवस्था (पाईपलाईन), तसेच जलकुंभ उर्ध्वगामी नलिका, ही कामे सुरु केली आहेत. शहरातील पाईप लाईनचे काम प्रथम पुर्ण करुन नंतर उपनगरे येथील कामे पुर्ण करण्याचे नियोजन केलेले आहे. पावसाळा जवळ आल्याने शहरातील पाईपलाईन करणे गरजेचे आहे. त्यानंतर उपनगरे व बाहेरचे काम करता येईल. पावसाळ्यापूर्वी शहरातील खोदकाम व रस्ते दुरुस्ती झाल्यास नागरीकांना अडचण निर्माण होणार नाही.

पाणीपुरवठा योजनेचे काम रखडले, विलंब झाला तर योजनेचा खर्च वाढत जावून योजनेला पुर्ण करण्यास विलंब होईल. योजनेचे काम नियोजनबध्द व दर्जेदारपणे करुन घेण्याची काळजी नगरपालिका प्रशासन घेणार आहे. त्यामुळे योजनेच्या कामासाठी सर्व नागरीक माता-भगिनी यांनी सहकार्य करावे. योजनेबद्दल शंका असल्यास प्रशासनाशी संपर्क करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.




योजनेविषयी माहीती देतांना मुख्याधिकारी यांनी म्हटले आहे की, जुनी पाणीपुरवठा योजना कालबाह्य झाल्याने, शहराचे विस्तारीकरण व लोकसंख्या वाढ, नवीन उपनगरे निर्माण झाल्याने पाणीपुरवठ्यामध्ये खुप अडचणी येत होत्या. यामुळे नगरपालिकेच्या प्रस्तावानुसार ७ एप्रिल २०१७ रोजी शेवगाव शहराला स्वतंत्र पाणीपुरवठा योजना करण्यासाठी नगरोत्थान कार्यक्रमाअंतर्गत मंजूरी देण्यात आली. त्यानुसार २२ नोव्हेंबर २०२२ रोजी योजनेला प्रशासकीय मान्यता मिळून ७/६/२०२३ ला इंद्रायनी कन्स्ट्रक्शन यांना कार्यरंभ आदेश दिले होते. परंतू सदर कंत्राटदाराने योजनेचे काम विहीत वेळेत, आवश्यक नियोजन न केल्याने व तांत्रीक अडचणीमुळे सुमारे वर्षभरानंतर २९/५/२०२४ ला ती निविदा रद्द करण्यात आली. त्यानंतर फेर निविदा प्रक्रिया करुन स्वस्तीक कंन्स्ट्रक्शन यांना ४/१०/२०२४ रोजी नवीन कार्यरंभ आदेश देण्यात आला. स्वस्तीक कंन्स्ट्रक्शन यांनी तात्काळ कामास सुरुवात केली व सद्यस्थितीत काम चांगल्या प्रकारे प्रगती पथावर आहे. निविदेनुसार ११३ कि.मी. वितरण व्यवस्थेची पाईपलाईनचे काम सुरु असून त्यापैकी ३५ कि.मी. ची पाईपलाईन पुर्ण झालेली आहे. उर्वरीत प्रगतीपथावर आहे. सर्वेक्षणानुसार इतर राहिलेल्या वस्त्या, नवीन वस्त्या, नवीन प्लॉटींग मधील वाढीव वितरण व्यवस्था ८५ कि.मी. असून त्यासाठी मान्यतेचा प्रस्ताव केलेला आहे. असे एकूण १९८ कि.मी. वितरण पाईपलाईनचे काम होणार आहे. या पाईपलाईनचे ८५ कि.मी. पाईप पुरवठा प्राप्त झालेला आहे. प्रस्तावीत ११.८३ लक्ष लिटरचा जलकुंभ, जलशुध्दीकरण केंद्राजवळ प्रस्तावीत असून त्याचे आर.सी. सी. डिझाईन सुरु आहे. ते होताच टाकीचे काम सुरु होईल. दुसरी टाकी ८.६० लक्ष लिटर कोरडे वस्ती येथे असून या टाकीचे ४५ टक्के काम झाले आहे व काम प्रगतीत आहे. तिसरी टाकी ५ लक्ष लिटर खंडोबामाळ, खुंटेफळ रोडचे आर.सी.सी डिझाईन सुरु आहे. व चौथी टाकी १.६० लक्ष लिटरचे काम सुरु असून पहीली लेव्हल झाली आहे. जलशुध्दीकरण केंद्राचे हॅड्रोलीक डिझाईन झाले असून आर.सी.सी. डिझाईन १० ते १२ दिवसात पुर्ण होईल. तसेच २० मे पर्यंत जलशुध्दीकरण केंद्राचे काम सुरु होईल. त्याचवेळी तेथील ११.८३ लक्ष लिटर टाकीचेही काम सुरु होईल. जलशुध्दीकरण केंद्रापासून जलकुंभापर्यंतची गुरुत्व वाहीनी नलीका (पाईप लाईन) ११.२१६ कि.मी. ची असून यासाठी पाईपचा पुरवठा प्राप्त झाला आहे. सार्वजनिक बांधकाम, जि. प. बांधकाम या विभागाकडील परवानग्यासाठी प्रस्ताव दिले असून परवानग्या मिळताच या पाईपलाईनचे काम सुरु होणार आहे.

नवीन पाणीपुरवठा योजनेच्या जॅकवेल ते जलशुध्दीकरण केंद्र, ऊर्ध्वगामी नलिका पाईपलाईन १७.२४८ कि.मी. असून १३ कि.मी. लांबीचे पाईप पुरवठा प्राप्त झाला आहे. पाईपलाईनचे १ कि.मी. काम पुर्ण झाले आहे. उर्वरीत काम सुरु आहे. तसेच प्रत्यक्ष जायकवाडी जलाशयातील भिंतीजवळ स्वतंत्र जॅकवेल, अप्रोच चॅनेल, पंप हाऊस व पोहोच पुल (अप्रोच ब्रीज) ही कामे होणार आहेत. जायकवाडी धरणात जेथे काम करायचे तेथे सुमारे ३ मीटर पाणीसाठा असून; पाणी कमी होताच जॅकवेल, अप्रोच चॅनेल, अप्रोच ब्रीजची कामे सुरु होतील. त्या दरम्यान वाईल्ड लाईफ वनविभाग यांची काम करण्यासाठी परवानगीचा प्रस्ताव मंजूरीसाठी पाठविलेला आहे. संबंधीत मंजुरी व पाणी कमी होताच धरणातील प्रत्यक्ष कामे सुरु होणार आहेत.

अशाप्रकारे शेवगाव शहरासाठी स्वतंत्र नवीन पाणी पुरवठा योजनेचे काम दर्जेदार व निर्धारीत वेळेत पुर्ण करुन शहर वासियांना दररोज १३५ लिटर दरडोई पाणीपुरवठा करण्यासाठी नगरपालिका प्रशासन काटेकोरपणे नियोजन करुन पुर्ण करणार आहे. हे काम पुर्णत्वास नेण्यासाठी सर्व शहरवासियांनी, सहकार्य करावे असे आवाहन मुख्याधिकारी विजया घाडगे यांनी केले आहे.

वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक- महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर-४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक- महादेव दळे, पत्ता- कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

# SPOT NEWS

## महाराष्ट्र दिनी जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण कार्यालयाचे शहरात उद्घाटन

● **नगर । वीरभूमी-**

महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या अधिसूचनेनुसार स्थापन करण्यात आलेल्या दिव्यांग कल्याण विभागाच्या अंतर्गत जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण कार्यालयाचे उद्घाटन महाराष्ट्र दिनी, गुरुवारी (दि. १ मे) अहिल्यानगर येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे पार पडले. या कार्यालयाच्या उद्घाटनप्रसंगी दिव्यांग कल्याणासाठी कार्यरत असलेल्या अनेक संघटना, सामाजिक कार्यकर्ते व मान्यवर उपस्थित होते. जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण कार्यालयाचे उद्घाटन जि.प. जिल्हा समाज कल्याण अधिकारी देविदास कोकाटे यांच्या हस्ते झाले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र, विळद घाटचे प्रकल्प संचालक डॉ. अभिजित दिवटे, सावली संघटनेचे अध्यक्ष बाबासाहेब महापुरे, लंके प्रतिष्ठानचे लिगल डव्हायझर उज्ज्वला घोडके, दिव्यांग शक्ती सेवा संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मधुकर घाडगे, प्रहार संघटनेचे राजेंद्र पोकळे उपस्थित होते. प्रास्ताविक जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी प्रशांत गायकवाड यांनी केले. या कार्यक्रमात विविध दिव्यांग संघटनांचे प्रतिनिधी बाबासाहेब महापुरे, मधुकर घाडगे, डॉ. शंकर शेळके, संतोष सरवदे यांनी आपले मनोगत व्यक्त करत दिव्यांगांना दैनंदिन जीवनात भेडसावणाऱ्या समस्या मांडल्या. त्यांनी शासकीय पातळीवर अधिक सहकार्य मिळावे, अशी अपेक्षा व्यक्त केली. डॉ. अभिजीत दिवटे व डॉ. दीपक अनाप यांनी जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्राद्वारे दिव्यांगांसाठी पुरविण्यात येणाऱ्या कृत्रिम अंगविकृती व साहाय्यक उपकरणांची माहिती दिली. या कार्यक्रमास मधुकर भावले, विजय आरोटे, योगेश अल्हाट, सचिन तरवडे, प्रदिप भोसले, भाऊसाहेब कदम, दिलीप जगधने आदी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विजय बळीद, गिन्यानदेव जाधव, सुयोग निमसे, उमाशंकर अवचट व मोहन कुंभखेले यानी विशेष प्रयत्न केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सामाजिक कार्यकर्ते संजय साळवे यांनी केले. विक्रम उंडे यांनी आभार मानले.

## अमेझिंग अबॅकसच्या १०३ विद्यार्थ्यांचे घवघवीत यश

● **नगर । वीरभूमी-**

अमेझिंग अबॅकसने आयोजित केलेल्या स्पर्धांमध्ये तब्बल १०३ विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळविले. मार्च महिन्यात झालेल्या स्पर्धेचे पारितोषिक वितरण नुकतेच हॉटेल यश ग्रँड येथे खा. निलेश लंके यांच्या हस्ते पार पडले. या वेळी माजी नगरसेवक योगिराज गाडे उपस्थित होते. या स्पर्धेत अहिल्यानगर, संभाजीनगर, सिल्लोड, नागपूर, मुंबई, तसेच परदेशातील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता. अबॅकसच्या या स्पर्धेमध्ये एकूण १०३ विद्यार्थ्यांना घवघवीत यश मिळाले. सार्थक गाली, अनुश्री भापकर, विनीत महादेव, नुपूर भामरे, ओम झोडगेकर, आरव माकीजा, ओवी दंडाळे, गायत्री अहिरे, शुभ्रा तरोडे, हर्ष उखाणे, अर्जुन पाटील या विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य मिळवले. अबॅकस ही गणिताची जुनी व अत्यंत प्रभावी तंत्रशुद्ध पद्धत असून त्यामुळे कमी वेळेत गणित सोडविण्याची कला अवगत होते. त्यामुळे अबॅकसचे महत्त्व वाढत आहे. या स्पर्धेमध्ये अहिल्यानगर छत्रपती संभाजी नगर सिल्लोड नागपूर मुंबईव अशा देशा परदेशातील विद्यार्थी सहभागी झाले होते. स्पर्धेचा बक्षीस वितरण सोहळा मोठ्या थाटात पार पडला. या वेळी विद्यार्थ्यांनी अबॅकसची प्रात्यक्षिके करून दाखवली. अवघड गणितांची उत्तरे अवघ्या काही सेकंदांत सोडवून उपस्थित खा. लंके यांच्यासह सर्वांनाच आचंबित केले. खा. लंके यांनी अमेझिंग अबॅकसचे संचालक किरण बल्लाळ व अश्विनी बल्लाळ यांच्यासह विद्यार्थ्यांचे कौतूक केले.

# दूध संघाच्या अवसायन प्रक्रियेचा आदेश होत नसल्याने उपोषण

**१७ महिन्यांपासून अंतिम आदेश प्रलंबित । कर्मचाऱ्यांच्या देणग्यांचे निवारण करण्याची मागणी**

● **नगर । वीरभूमी-**

अहमदनगर तालुका सहकारी दूध व्यावसायिक व प्रक्रिया संघ मर्यादित या संस्थेच्या अवसायन प्रक्रियेला १७ महिन्यांचा प्रदीर्घ कालावधी उलटूनही अंतिम आदेश न झाल्यामुळे कर्मचाऱ्यांच्या वतीने विभागीय उपनिबंधक सहकारी संस्था (दुग्ध) नाशिक येथील कार्यालया समोर साखळी आमरण उपोषण सुरु करण्यात आले आहे. तर सर्वप्रथम कर्मचाऱ्यांच्या देणग्यांचे निवारण करण्याची मागणी उपोषणकर्त्यांनी केली आहे.




गुरुवारी (दि.१ मे) महाराष्ट्र दिनापासून तायगा शिंदे व गजानन खरपुडे यांच्या नेतृत्वाखाली सुरु झालेल्या उपोषणात कुंडलिक देवकर, दत्तात्रय बेकारसे, अशोक डहाने, आप्पासाहेब ढवळे, अशोक धनगर, बाबजी शिंदे, भाऊसाहेब पळसकर, रमेश वायकर, बाबासाहेब चतुर, संभाजी निमसे, कोंडीभाऊ शेळके, बाळासाहेब थोरात, सुनिल निमसे, बाळासाहेब बेरड सहभागी झाले होते.

८ नोव्हेंबर २०२३ रोजी विभागीय उपनिबंधक सहकारी संस्था (दुग्ध) नाशिक विभाग यांनी संघाला अवसायनात घेतल्याचे अंतरिम आदेश काढले होते. मात्र, कायद्यानुसार एक महिन्याच्या आत अंतिम आदेश अपेक्षित असतानाही आजतागायत तो आदेश न झाल्यामुळे कर्मचारी वर्गामध्ये असंतोष पसरला आहे. सदर निर्णयात माजी संचालक मंडळाने संघाचे आर्थिक नुकसान केल्याचे पुरावे असूनही त्यांच्यावर अद्याप ठोस कारवाई झालेली नाही. उलट, त्यांच्या पाठीशी राजकीय पाठबळ असल्याचा गंभीर आरोप कर्मचाऱ्यांनी केला आहे.

कर्मचाऱ्यांचे म्हणणे आहे की, सध्याचे प्रभारी कार्यकारी संचालक माजी संचालक मंडळाच्या संपर्कात राहून कारवाईस विलंब लावत आहेत. देणी आणि प्रॉव्हिडंट फंड मिळण्यासाठी आवश्यक कागदपत्रे कार्यालयाकडून देण्यात येत नाहीत. एवढेच नव्हे, तर कार्यालयाकडून योग्य माहिती देण्यासही टाळाटाळ होत आहे.

प्रशासनाच्या दिरंगाईमुळे कर्मचाऱ्यांना त्यांचे कायदेशीर हक्क मिळत नसून, ही बाब अन्यायकारक आहे. न्यायालय किंवा इतर कोणत्याही प्राधिकरणाकडून स्थगिती आदेश नसताना, अवसायनाचे अंतिम आदेश प्रलंबित ठेवणे हा राजकीय हस्तक्षेप असल्याचा ठपका कर्मचाऱ्यांनी ठेवला आहे. यामुळे संघातील कर्मचाऱ्यांना आर्थिक व मानसिक त्रास सहन करावा लागत असल्याचे म्हटले आहे.

## तुंगभद्रा येथून पवित्र जल आणलेल्या कावडीचे स्वागत



● **नगर । वीरभूमी-**

वाळकी (ता. नगर) येथील सद्गुरु महेंद्रनाथ यांच्या चतुर्थ समाधी सोहळ्यानिमित्त श्रीराम मंदिरात भव्य धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर आंध्र प्रदेशातील श्री क्षेत्र मंत्रालय (आंध्रप्रदेश) येथील तुंगभद्रा नदीतील पवित्र जल घेऊन आलेल्या नाथ संप्रदायाच्या कावड यात्रेचे बनपिंपरी (ता. श्रीगोंदा) येथे सामाजिक कार्यकर्ते विजय भालसिंग यांनी सपत्निक मोठ्या स्वागत केले. या वेळी मोठ्या संख्येने नाथ भक्त उपस्थित होते.

रविवारी (दि. ४ मे) वाळकी येथे नाथ भक्तांनी श्रीराम मंदिरात धार्मिक सोहळ्याचे आयोजन करण्यात आलेले आहे. ६०० किलोमीटर पायी चालत तुंगभद्रा नदीतील पवित्र जल घेऊन आलेल्या कावड यात्रेची मिरवणुक काढण्यात येणार आहे. श्रीराम मंदिरात सद्गुरु महेंद्रनाथ यांच्या समाधीस्थळी कावडने आणलेल्या तुंगभद्राच्या पवित्र जलाने महाभिषेक करण्यात येणार आहे. त्यानंतर होमवनाचा धार्मिक कार्यक्रम पार पडेल. सकाळी १० ते १२ या वेळेत कीर्तनकार ह.भ.प. रामायणाचार्य समाधान महाराज शर्मा यांचे कीर्तन होणार आहे. कीर्तनानंतर उपस्थित भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. या भव्यदिव्य धार्मिक सोहळ्याचा लाभ घेण्याचे आवाहन नाथ संप्रदायातील भक्तांनी सर्व ग्रामस्थांनी केले आहे.

## अकोले सेवा सोसायटीच्या चेअरमनपदी मिलिंद नवले तर व्हा.चेअरमनपदी उत्तमराव धुमाळ

● **अकोले । वीरभूमी-**





नुकत्याच झालेल्या अकोले विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी च्या संचालक मंडळाची निवडणूक झाली त्यामध्ये शेतकरी विकास मंडळाचे सर्व संचालक निवडून आले.

आज निवडणूक निर्णय अधिकारी योगेश कापसे यांच्या अध्यक्षतेखाली सोसायटीच्या चेअरमन व व्हा.चेअरमन पदासाठी निवडणूक प्रकिया पार पडली. यावेळी चेअरमन पदासाठी मिलिंद नवले तर व्हा. चेअरमन पदासाठी उत्तमराव धुमाळ यांचा एकमेव उमेदवारी अर्ज आल्याने त्यांची बिनविरोध निवड झाल्याची घोषणा करण्यात आली.मिलिंद नवले यांना सूचक म्हणून वसंतराव धुमाळ व अनुमोदक म्हणून अनिल गायकवाड यांनी सही केली तर उत्तमराव धुमाळ यांच्या अर्जावर सुचक म्हणून सुनील नवले यांनी व अनुमोदक म्हणून रामहरी चौधरी यांनी सही केली.

यावेळी सर्व संचालक मा. वसंतराव धुमाळ, गंगाराम धुमाळ, अनिलराव गायकवाड, सुनील नवले, एकनाथ मंडलिक, दत्तात्रय शेणकर, रामहारी चौधरी, हेमंत दराडे, सौ. हिरा नाईकवाडी, सौ. विमल झोळेकर, दिनकर जगताप आदी उपस्थित होते.

सहायक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणुन रावसाहेब नवले यांनी काम पाहिले. निवडणूक प्रक्रिया संपल्यावर नवनिर्वाचित चेअरमन व व्हा. चेअरमन यांचा सत्कार करण्यात आला. ही निवडणूक प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी ज्येष्ठ नेते मधुकरराव नवले, शिवाजी राजे धुमाळ, महेशराव नवले, उत्तमराव धुमाळ, मच्छिंद्र धुमाळ, रमेशराव जगताप, बाळासाहेब नाईकवाडी, सचिन शेटे, परशराम शेळके, बाळासाहेब ताजणे, अण्णासाहेब नवले, अनिल नवले, राधाकिसन रामचंद्र धुमाळ, मच्छिंद्र मंडलिक व रघुनाथ शेणकर यांनी विशेष सहकार्य केले.

चेअरमन मिलिंद नवले यांना अहमदनगर जिल्हा सहकारी बँकेच्या व्यवस्थापक पदाचा अनुभव असून उत्तमराव धुमाळ यांनी या पूर्वी अकोले सोसायटीचे चेअरमन पद सक्षमपणे सांभाळलेले आहे. विशेष म्हणजे ते दोघेही एम. कॉम असून वर्गमित्र आहेत. या निवडीबद्दल सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

## राजूर कावीळ साथीमुळे आ. लहामटेंच्या ढोंगी विकासाचा बुरखा फाटला : भाकपचा गंभीर आरोप

● **अकोले । वीरभूमी-**

राजूर येथील भयावह कावीळ साथीमुळे संपूर्ण राजुरकर नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. राजूर हे आदिवासी भागाची मुख्य बाजारपेठ असल्याने संपूर्ण आदिवासी भागाचे आरोग्यही या साथीमुळे धोक्यात आले आहे. आजपर्यंत दोन रुग्णांना कावीळ या आजाराने आपला जीव गमवावा लागला असून शेकडो रुग्ण जीवन मरणाशी झुंज देत आहेत. दूषित पाण्याचा दीर्घकाळ पुरवठा झाल्यामुळे संपूर्ण शहरात कावीळ या आजाराने थैमान घातले आहे. लागण झालेल्या कमी वयातील व बालवयातील रुग्ण तातडीने अत्यावस्त होत असून नागरिकांमध्ये यामुळे अत्यंत भयग्रस्त वातावरण निर्माण झाले आहे.

राजूर ग्रामपंचायत डॉ. लहामटे यांच्या ताब्यात असून ते स्वतःही राजुर येथे वास्तव्यास आहेत. उठता बसता अधिकाऱ्यांच्या आढावा बैठका घेतल्या जात असताना या बैठकांमध्ये केवळ ठेकेदार आणि अधिकाऱ्यांचा आर्थिक देवाणघेवाण करण्याचाच आढावा घेतला जातो का? असा सवाल या निमित्ताने उपस्थित होत आहे. पिण्याचे शुद्ध पाणी आणि आरोग्य याबाबत डॉक्टर असलेल्या आमदारांकडून असे दुर्लक्ष होणार असेल तर त्यांचे विकासाचे मॉडेल किती निकृष्ट आहे हे यावरून सिद्ध होते.

चार रस्ते केले व एक बस स्थानक सजवले म्हणजे विकास झाला असे होत नसते. राजुर सारख्या बाजारपेठेच्या गावातली टाकी वर्षानुवर्ष साफ केली जात नाही. त्यात सडलेले प्राणी, कचरा आणि घाण सातत्याने सडत राहते. सडलेले दूषित पाणी नागरिकांना पुरविले जाते. जी ग्रामपंचायत आमदारांच्या ताब्यात आहे त्या ग्रामपंचायतीच्या पाणीपुरवठा व आरोग्याच्या बाबत ही अवस्था असेल तर तालुका भर काय परिस्थिती असेल याचा यावरून अंदाज बांधता येतो. जलजीवन योजनेच्या कामांमध्ये तालुका भर मोठा भ्रष्टाचार झाला असून या भ्रष्टाचारामध्ये तालुक्यातील सत्ताधारी मोठ्या प्रमाणात सहभागी आहेत. विकासाचे हे मॉडेल खरे तर भ्रष्टाचाराचे मॉडेल बनले आहे.

ग्रामसेवकांना निलंबित करून, झालेल्या घटनेबाबत पुरेसा न्याय होणार नाही. आमदार लहामटे यांनीच या संपूर्ण अपयशाची जबाबदारी घेतली पाहिजे. जनतेची माफी मागितली पाहिजे.

उठता बसता सोशल मीडियावर जनता दरबाराचे फोटो टाकून आपली पाठ थोपटून घेताना, आपल्या खुर्ची खाली किती अंधार आहे हे डॉक्टर लहामटे यांनी या निमित्ताने पाहून आत्मपरीक्षण केले पाहिजे. त्यांनी हे असे आत्मपरीक्षण करावे व चूक मान्य करून जनतेची माफी मागावी तसेच स्वतःची पाठ थापटून घेणे थांबवत संपूर्ण मतदारसंघभर जनतेला पिण्याचे शुद्ध पाणी मिळेल यासाठी व्यवस्था करावी अशी मागणी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या वतीने कॉम्रेड सदाशिव साबळे, नामदेव भांगरे, एकनाथ मेंगाळ, प्रकाश साबळे, सुमन विरनक, राजाराम गंभीरे, वसंत वाघ, लक्ष्मण घोडे, सुनील बांडे, दत्ता कोंढार बहरू रेंगडे, अर्जुन गंभीरे यांनी केली आहे.

# महाराष्ट्र दिनी अवयवदात्या कुटुंबांचा पालकमंत्री ना. विखेंच्या हस्ते गौरव

**मरणानंतरही अवयवदानाने इतरांना नवजीवन देवून मिळते अमरत्व**

● **नगर । वीरभूमी-**

युवकाच्या अपघाती मृत्यूनंतर दुःख पचवत अवयवदानाने इतरांना नवजीवन देण्याचा महान निर्णय घेतलेल्या अवयवदात्या कुटुंबाचा जिल्हा शासकीय रुग्णालयाच्या वतीने जलसंपदामंत्री व पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून पोलीस मुख्यालय येथे शासकीय ध्वजारोहण सोहळ्यानंतर हा विशेष सत्कार समारंभ पार पडला.



या कार्यक्रमात स्व. योगेश डोंगरे (वय २५, रा. साकूर, ता. संगमनेर) यांचे बंधू गणेश किसन डोंगरे, तसेच अनिल कचरु आमले, गोरख तान्हाजी बागुल, एकनाथ विठ्ठल गंभीरे या परिवारातील सदस्यांचा प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमास जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा पोलीस अधीक्षक राकेश ओला, जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर, डॉ. विखे पाटील फाऊंडेशनचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. सतीश मोरे, अवयवदान समन्वयक राज गिरी, जिल्हा नेत्र व अवयवदान जागृती समुपदेशक सतीश आहिरे हे उपस्थित होते.

२५ वर्षीय योगेश डोंगरे यांचा अपघात झाल्यानंतर त्यांना गंभीर दुखापत झाली होती. उपचारादरम्यान त्यांना ब्रेन स्टेम डेथ घोषित करण्यात आले. अशा कठीण प्रसंगी त्यांचे कुटुंबीयांनी धाडसाने निर्णय घेत योगेशचे अवयव दान करण्याचे ठरवले. त्यांच्या या निर्णयामुळे अनेक रुग्णांना जीवनदान मिळाले आहे. त्यांचे अवयव विविध रुग्णांना प्रत्यारोपणासाठी यशस्वीरित्या वापरण्यात आले. हा संपूर्ण अवयवदान प्रकल्प डॉ. विखे पाटील फाऊंडेशनच्या वैद्यकीय पथक, जिल्हा शासकीय रुग्णालय, आणि प्रशासनाच्या समन्वयाने पार पडला. जिल्ह्यात नेत्रदान, अवयवदान चळवळ जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. नागोराव चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली सक्षमपणे राबविली जात आहे.

# तालुक्याच्या संरक्षणाचे आमदारकीचे कवच जनतेने घालविले

## माजी मंत्री बाळासाहेब थोरात । संगमनेर खुर्द येथे कारखाना सभासद व युवकांचा स्नेहसंवाद मेळावा



**● संगमनेर । वीरभूमी–**

एकही दिवस विश्रांती न घेता सातत्याने चाळीस वर्ष काम केले. दुष्काळग्रस्तांसाठी धरण व कालवे पूर्ण केले. आपला तालुका, विविध सहकारी संस्था यांना आमदारकीचे संरक्षणाचे कवच होते. जाती धर्माच्या नावाखाली खोट्या भुलथापांमुळे हे कवच जनतेने घालवले असून तालुक्याचे हक्काचे पाणी मिळवण्याबरोबर तालुका जपण्यासाठी संघटित होऊन संघर्ष करावा लागणार असल्याचे प्रतिपादन लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी केले आहे.

संगमनेर खुर्द येथील कुबेर लॉन्स येथे सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याच्या सभासद शेतकरी युवक व कार्यकर्त्यांच्या स्नेहसंवाद मेळाव्यात ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर ॲड. माधवराव कानवडे, बाबासाहेब ओहोळ, रणजितसिंह देशमुख, इंद्रजीतभाऊ थोरात, संपतराव डोंगरे, पांडुरंग पा घुले, आर. बी. रहाणे, अर्चना बालोडे, नवीन संचालक रामनाथ कुटे, नवनाथ आरगडे, विनोद हासे, विजय राहणे, विलास शिंदे, अंकुश ताजणे, दिलीप नागरे, राजेंद्र चकोर, संतोष मांडेकर, भाऊराव रहाणे, सरपंच गणेश शिंदे, मधुकर गुंजाळ, रमेश सुपेकर आदींसह परिसरातील विविध कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी लोकनेते बाळासाहेब थोरात म्हणाले की, धर्माच्या नावावर विधानसभा निवडणुकीत जनतेला फसवले गेले. विधानसभेच्या निवडणुकीनंतर तालुक्याची बसवलेली घडी थोडी विस्कटली. सरळ विरोधक परवडले पण दोन्हीकडे राहणारे नको. आपला तालुका कुटुंब आहे. चुकीच्या पद्धतीने वागले तर त्याचा त्रास सर्वांना होतो. मागील ४० वर्षात एकही दिवस विश्रांती घेतली नाही सातत्याने काम केले धरण आणि कालवे आपणच पूर्ण केले. हक्काचे पाणी संगमनेर तालुक्याला मिळालेच पाहिजे. तालुक्यातील कालव्यांना प्लास्टर चे काम सुरू झाले. आपली पहिली मागणी होती की अगोदर आमचे तालुक्यातील शेतकऱ्यांचे बारे काढून द्या आणि मग प्लास्टर करा. हे पाणी सर्वांना मिळालेच पाहिजे. ते काम आता होत आहे.

आमदारकी हे सर्व तालुका व सहकारी संस्थांना मोठे कवच होते. मात्र जनतेने ते कवच गमावले आहे. त्याचा लगेच त्रास सुरू झाला आहे. शहराजवळील गावांना आश्वी अप्पर तहसील कार्यालयाला जोडण्याचा डाव आहे. तर शहरांमध्ये अशांतता निर्माण झाली आहे. अशी परिस्थिती यापूर्वी कधीही नव्हती. आपले सुसंस्कृत राजकारण व संस्कृती टिकवण्यासाठी आपल्यातील मतभेद विसरून तालुक्याच्या कुटुंबासाठी संघटित होऊन संघर्ष करावा लागणार आहे.

कारखान्याने कायम सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात यांच्या शिस्तीवर काम केले असून आगामी काळामध्ये प्रति एकरी शंभर टन ऊस उत्पादन करावा लागणार आहे. कार्यक्षेत्रात ऊस उत्पादन वाढल्याने राज्यात एक नंबर देणे भाव सातत्याने शक्य होणार आहे. सर्व सहकारी संस्थांचे काम चांगले असून तालुक्यातील सर्व जनता व विरोधकही मान्य करतात. विधानसभेत चूक झाली असेल परंतु आता सहकारी संस्थांच्या बाबत होणार नाही.

झालेल्या चुका दुरुस्त करून सर्वांनी एकजुटीने तालुक्याच्या विकासासाठी एकत्र यावे असे आवाहन त्यांनी केले.

ॲड. माधवराव कानवडे म्हणाले की, सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी हक्काच्या पाण्यासाठी संघर्ष करून ३० टक्के पाणी धरण व कालवे पूर्ण कायम जनतेसाठी काम करणारे हे नेतृत्व आहे. मात्र त्यांचा पराभव हा तालुक्यासाठी मोठा अपघात असून हे झालेच कसे असा राज्याला प्रश्न पडला आहे. यामध्ये कार्यकर्ते कमी पडले असून तरुणांनी जातीभेदाच्या आमिषाला बळी न पडता संत ज्ञानेश्वर व समतेचा विचार घेऊन काम करावे असे ते म्हणाले.

बाबासाहेब ओहोळ म्हणाले की, लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली आपण सातत्याने चांगले काम केले. तालुका स्तरावर आपल्याला मोठी संधी दिली याबद्दल कृतज्ञता व्यक्त करताना या पुढील काळातही लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली एकजुटीने काम करू असे ते म्हणाले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुभाष पाटील गुंजाळ यांनी केले. तर रवी नेहे यांनी आभार मानले. यावेळी चंदनपुरी, आनंदवाडी, झोळे, संगमनेर खुर्द, खांडगाव, यशवंतनगर, निमज, सावरगाव तळ येथील सभासद शेतकरी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### शेतकऱ्यांचे पाईप अधिकाऱ्यांनी कोणाच्या सांगण्यावरून फोडले

■ संगमनेर तालुक्याला हक्काचे पाणी मिळाले पाहिजे. कालव्यांच्या वरील भागातील शेतकऱ्यांनाही त्यांचे पाणी देण्यासाठी तातडीने काम झाले पाहिजे. आम्ही हक्काचे पाणी मागत आहोत. ते मिळत नसल्याने शेतकऱ्यांनी पाईप टाकले. हे पाईप अधिकाऱ्यांनी कुणाच्या सांगण्यावरून फोडले असा सवाल करताना मंत्री महोदय असा चुकीचा आदेश देतील असे मला वाटत नाही असे ते म्हणाले. मग हे पाईप फोडण्याचे धारिष्ट झाले कसे? कुणाच्या आदेशावरून पाईप फोडले. शेतकऱ्यांशी चर्चा केली पाहिजे. खालच्या भागाचे शेतकरी सुद्धा आपलेच आहेत. परंतु समन्वय करून प्रश्न सोडवता येतो. पाणी मिळाले नाही तरी अनेक ग्रामपंचायतींना पाणीपट्टीच्या नोटीसा आलेल्या आहेत. पहिले शेतात पाणी द्या, मग पाणीपट्टी भरतो. असे सांगताना प्रवरा नदीकाठच्या शेतकऱ्यांना १८ तास लाईट मिळाली पाहिजे मात्र रोटेशन चालू असताना पाच तास सुद्धा लाईट मिळत नाही. हे काय सुरू आहे. आता आपल्या तालुक्याच्या संरक्षणाचे आमदारकीचे कवच नसल्याने हा त्रास सहन करावा लागणार म्हणून सर्वांनी संघटित होऊन संघर्ष करण्यासाठी तयार राहा, असे आवाहन लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी केले.

# देशाच्या विकासात महाराष्ट्राचा मोठा वाटा

## लोकनेते बाळासाहेब थोरात । यशोधन कार्यालयात महाराष्ट्र दिनी ध्वजारोहण



**● संगमनेर । वीरभूमी–**

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या समतेच्या व बंधुभावाच्या विचारांवर काम करणारा महाराष्ट्र हा विकासात देशात अग्रगण्य आहे. मानवता धर्माचा विचार देणाऱ्या महाराष्ट्राचा देशाच्या विकासात मोठा वाटा असल्याचे गौरवोद्गार काँग्रेसच्या राष्ट्रीय वर्किंग कमिटीचे सदस्य लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी काढले आहे.

महाराष्ट्र दिनाच्या निमित्ताने शेतकी संघ यशोधन कार्यालय येथे लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी इंद्रजीत भाऊ थोरात, डॉ जयश्रीताई थोरात यांसह विविध पदाधिकारी उपस्थित होते.

याप्रसंगी बोलताना लोकनेते बाळासाहेब थोरात म्हणाले की, भारतामध्ये विविधता आहे. विविध जाती जमाती समाज हा भारतीय या नावाखाली एकत्र आनंदाने राहतो आहे. लोकशाही व राज्यघटना ही आपली ताकद आहे.

संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीमध्ये अनेकांनी हुतात्मे पत्करले. एक मे १९६० रोजी मुंबईसह महाराष्ट्र राज्य निर्माण झाले. महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतर पहिले मुख्यमंत्री स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांनी आधुनिक महाराष्ट्राची घडी बसवली. शेती, सहकार, शिक्षण, ग्रामीण विकास, साहित्य, कला, संस्कृती, औद्योगीकरण, जलसंधारण, विविध पायाभूत सुविधा अशा सर्व क्षेत्रांमध्ये महाराष्ट्राने मोठी प्रगती केली. आर्थिक समृद्धता निर्माण केली. त्यामुळे देशाच्या प्रगतीमध्ये कायम महाराष्ट्राचा वाटा मोठा राहिला आहे.

महाराष्ट्र दिनाबरोबर आज कामगार दिन ही सर्वत्र मोठ्या आनंदाने साजरा होत आहे. महाराष्ट्राच्या प्रगतीमध्ये कायम कामगार व कष्टकरी बंधूंचा मोठा वाटा राहिला आहे. सध्या मात्र जातीभेदाच्या नावावर होणारे राजकारण हे अत्यंत दुर्दैवी असून समतेचा व मानवतेचा महाराष्ट्र धर्म वाढवण्यासाठी तरुणांनी एकत्र येऊन काम करावे, असे आवाहन त्यांनी केले.

अमृत उद्योग समूहातही थोरात सहकारी साखर कारखाना, राजहंस दूध संघ, अमृतवाहिनी कॉलेज सह्याद्री शिक्षण संस्था यांसह संगमनेर तालुक्यातील विविध गावे व विविध संस्थांमध्ये महाराष्ट्र दिन मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला.

# कामगार दिनानिमित्त भिंगारला उद्यान विभागातील कामगारांचा हरदिन मॉर्निंगकडून सन्मान

**● नगर । वीरभूमी–**

कामगार दिनानिमित्त हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या वतीने गुरुवारी (दि.१ मे) भिंगार कॅन्टोन्मेंट मधील उद्यान विभागातील कामगारांचा सन्मान करण्यात आला. भगवान गौतमबुध्द जॉगींग पार्कमध्ये झालेल्या कामगार दिनाच्या कार्यक्रमात स्वच्छता अभियान राबवून वृक्षारोपण करण्यात आले.

हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या प्रत्येक सदस्यांचा वाढदिवस वृक्षारोपणाने साजरा होत असताना ग्रुपच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त नातवाच्या नावाने एक झाड या उपक्रमाचे प्रारंभ देखील करण्यात आले. येत्या पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात ग्रुपच्या माध्यमातून वृक्षारोपणाचे नियोजन करण्यात आले आहे. प्रारंभी भगवान गौतम बुद्धांच्या पुतळ्यास अभिवादन करून विकास भिंगारदिवे बुद्ध वंदना केली. ईवान सपकाळ व नंदलाल परदेशी यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. वर्षभर उद्यानातील झाडांची काळजी घेऊन त्यांचे संवर्धन करणारे कॅन्टोन्मेंट उद्यान विभागातील दिपकराव अमृत, विशाल भामरे, दीपक गायकवाड, राहुल भिंगारदिवे यांचा सत्कार सोहळा पार पडला.

या कार्यक्रमाप्रसंगी ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष संजय सपकाळ, सचिनशेठ चोपडा, रमेश वराडे, रतनशेठ मेहेत्रे, जहीर सय्यद, अशोकराव लोंढे, सर्वेश सपकाळ, प्रांजली सपकाळ, कांताताई झंवर, संगीता सपकाळ, सविताताई परदेशी, सुवर्णा महागडे–भिंगारदिवे, सुनिता चव्हाण, कांताबाई स्वामी, लताबाई सपकाळ, दिलीपराव ठोकळ, ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज अनावडे, दीपकराव धाडगे, विकास भिंगारदिवे, सुधीरशेठ कपाळे, विलास आहेर, दिलीपशेठ गुगळे, अशोकराव पराते, दीपकराव घोडके, कुमार धतुरे, प्रशांत भिंगारदिवे, अनंत सदलापूर, चुनीलाल झंवर, सरदारसिंग परदेशी, सुभाष पेंढुरकर, शेषराव पालवे, अनिलराव सोळसे, अविनाश जाधव, योगेश चौधरी, अविनाश पोतदार, अनिल हळगावकर, रामनाथ गर्जे, राजू कांबळे, रमेश कोठारी, सूर्यकांत कटोरे, नामदेवराव जावळे, सुहास देवराईकर, विकास निमसे, सिताराम परदेशी, विनय महाजन, बाळासाहेब झिंजे, महेश सरोदे, देविदास गंडाळ, प्रकाश गांधी, प्रवीण परदेशी, दशरथराव मुंडे, सागर काबरा, संदीप शिंगवी आदींसह ग्रुपचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वसुंधरा अकॅडेमीच्या विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश; २४ विद्यार्थी पात्र

**● अकोले । वीरभूमी–**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेतर्फे फेब्रुवारी महिन्यात घेण्यात आलेल्या इ. पाचवी आणि आठवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेचा अंतरिम निकाल नुकताच जाहीर करण्यात आला. या परीक्षेत अभिनव शिक्षण संस्था संचलित वसुंधरा अकॅडेमीचे विद्यार्थी उत्तुंग यश संपादन करत शिष्यवृत्तीसाठी २४ विद्यार्थी पात्र ठरले आहेत. यानिमित्ताने सर्व पात्र विद्यार्थी व त्यांच्या पालकांचा कौतुक व सन्मान सोहळा शाळेमध्ये आयोजित करण्यात आला. अभिनव शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मधुकरराव नवले, प्राचार्या डॉ. जयश्री देशमुख व प्राचार्या राधिका नवले यांच्या शुभहस्ते सर्व विद्यार्थी, पालक व मार्गदर्शक शिक्षक यांना सन्मानित करण्यात आले.

यावेळी अध्यक्ष मधुकरराव नवले यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व त्यांच्या पालकांचे कौतुक केले व या त्यांच्या यशाचा सार्थ अभिमान आहे. विद्यार्थ्यांचे आजचे यश हेच त्यांच्या भविष्यातील वाटचालीची नांदी आहे हे सर्व पालकांनी लक्षात घ्यावे. असे प्रतिपादन केले.

प्राचार्या डॉ. जयश्री देशमुख यांनीही विद्यार्थी व त्यांना नेहमी पाठबळ देणाऱ्या पालकांचे विशेष कौतुक केले व हे आनंदाचे क्षण विद्यार्थी, शिक्षक व पालक यांनी एकत्रितपणे साजरे करावे. जेणेकरून विद्यार्थ्यांना अधिक प्रोत्साहन मिळून ती यशाची उत्तुंग शिखरे सर करतील व जीवन समृद्ध करू शकतील अशी भावना व्यक्त केली.

पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत वसुंधरा अकॅडेमीच्या शिवरत्न भूषण साठे (२४० गुण), निशांत सुदाम सोनवणे (१७२ गुण), आरोही गिरीश नवले(१७० गुण), शौर्य दीपक कचरे (१६८ गुण), गायत्री विशाल देशमुख (१६० गुण), आराध्या सचिन गायकवाड (१५८ गुण), हर्षवर्धन अनिल चासकर (१५० गुण), व्यास देवानंद आरोटे (१४८ गुण), तेजस प्रभाकर येलमामे (१४४ गुण), स्वरा सचिन नाईकवाडी (१४० गुण), ध्रुवराज देवदत्त शेटे (१४० गुण), विराज जगन्नाथ जाधव (१३८ गुण), ईश्वरी शरद सातपुते (१३६ गुण), अनंत गोरखनाथ खेडकर (१३० गुण) हे विद्यार्थी तर पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत शुभम अजिनाथ कदम (२२० गुण), ओम सुरींदर वावळे (१७६ गुण), आर्यन जनार्दन आभाळे (१५४ गुण), अनन्या विकास वणवे (१४६ गुण), भक्ती विकास साळवे (१३८ गुण), शिवराज धनेश देशमुख (१३८ गुण), ईशा विजय गलांडे (१३६ गुण), श्रद्धा चंद्रभान लांडगे (१३४ गुण), सार्थक एकनाथ तळपे (१२८ गुण) व तनिष्का संतोष गायकवाड (११८ गुण)



असे एकूण २४ विद्यार्थी शिष्यवृत्तीस पात्र ठरले आहेत.

या सर्व विद्यार्थ्यांना सुमैय्या शेख, अरुणा बगनर, मेघा भालेराव, उज्ज्वला मुसळे, प्राजक्ता सोलपुरे, शोभा नवले, विजय जाधव, कल्पना मंडलिक, अजय हांडे, स्नेहा पेंडभाजे या शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व त्यांच्या पालकांचे अभिनव शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मधुकरराव नवले, कोषाध्यक्ष तथा कॅम्पस डायरेक्टर प्राचार्या डॉ. जयश्री देशमुख, सचिव मा. विक्रम नवले, सहसचिव प्राचार्या अल्फोंसा डी., प्राचार्या राधिका नवले यांनी अभिनंदन केले. कार्यक्रमासाठी सर्व पालक, विद्यार्थी व शिक्षक उपस्थित होते. मान्यवरांचे स्वागत वृषाली शेटे व प्रास्ताविक सुमैय्या शेख यांनी केले तर सूत्रसंचालन प्राजक्ता नेटके व मेघा भालेराव यांनी केले.